# Shri Gajanan Seva, Bay Area, California

# Shri Gajanan Maharaj Shejarati



आता स्वामी सुखे निद्रा करा अवधूता, चिन्मय सुखधामी जाऊन पहुडा एकांता |
वैराघ्याचा कुंचा घेऊन चौक झाडीला, गुरु हा चौक झाडीला, तयावरी सप्रेमाचा छिडकावा केला |
पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ती, ज्ञानाच्या समया उजळुनी लाविल्या ज्योती |
भावार्थाचा मंचक हृदयकाशी टांगीला, मनाची सुमने करुनि केले शेजेला |
द्वैताचे कपाट लोटून एकत्र केले, गुरु हे एकत्र केले, दुर्बुद्धीच्या गाठी सोडून पडदे सोडिले |
अशा तृष्णा कल्पनेचा सांडून गलबला, दया क्षमा शांती दासी उभ्या शेजेला |
अलक्ष उन्मनी घेऊनि नाजूकसा शेला, निरंजनी सद्गुरु माझा निजे शेजेला |